N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण    **P.S.(ठाणे):** भिवापूर    **Year (वर्ष):** 2022

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0261    **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/07/2022 23:08 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्हाची घटना):**

   1. **Day(दिवस):** शुक्रवार    **Date From (दिनांक पासून):** 22/07/2022

      **Time Period (कालावधी):** पहर 5    **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/07/2022

      **Time From (वेळेपासून):** 12:43 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 14:03 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 22/07/2022    **Time (वेळ):** 22:30 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

   **Entry No. (नोंद क्र.):** 042    **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/07/2022 22:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** पंचायसमिती कार्यालय ,भिवापुर, 441201

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

   (a) **Name (नाव):** श्री गोपाल किसन [illegible]ोडगे

   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991    (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**    **Date of Issue (दिल्याची तारीख):**

   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट क्र,कोरके ले आउट,खरबी चौक ,नागपुर ,भिवापूर,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट क्र,कोरके ले आउट,खरबी चौक ,नागपुर ,भिवापूर,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक संजु दिलीप नाईक | | | 1. सालेभट्टी ,सालेभट्टी,भिवापुर,भिवापूर, नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत-441201 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | चलनी पाचशे रुपयाचा दहा नोटा आणि बनावटी पाचशे रुपयाचा चार नोटा | 7,000.00 |
| 2 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | मेमोरी कार्ड Sandisk Ultra कंपनी चे 32 GB | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 7,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

तक्रारलाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर दिनांक 21/07/2022वेळ: 12ः 30 वा.माझे नावः- श्री. गोपाल किसन झोडगे, वय 31 वर्षे
व्यवसाय- भावना टुर अन्ड ट्रव्हल्स ह.मु. प्लट क्रं. 46 कोरके ले आउट, खरबी पोलीस चौकी जवळ, खरबी नागपूर, मुळ पत्ताः- मु. सालेषहरी,
पो. थुटानबोरी, तह. भिवापुर, जि.नागपूर मो.क्र. 7066647723.मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, झिरो माईल नागपूर कार्यालयात
हजर येऊन तक्रार देतो की, मी वर नमूद पत्यावर वास्तव्यास असून, माझा भावना टुर अन्ड ट्रव्हल्स नावानी व्यवसाय आहे. माझे मुळ गाव मु.
सालेषहरी, पो. थुटानबोरी, तह.भिवापुर, जि.नागपूर हे असुन तिथे माझे वडील किसन झोडगे यांचे नावानी 4000 स्केअर फुटचा खाली प्लट
आहे. त्या प्लट वर घरकुल मंजूर होणे करीता मी माझे वडील नामे किसन बाळा झोडगे वय 80 वर्ष यांचे नावानी गेल्या वर्षी अर्ज केला होता.
तरी त्या प्लट वर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत मागील महिन्या घरकुल मंजूर झाल्याचे मला ग्राम सालेषहरी येथील सरपंच नामे संजु उर्फ
संजय नाईक यांनी फोन करून सांगीतले. तेव्हा मी ग्रा.पं.सालेषहरी येथे जावुन बघीतले असता तेथे बाहेर लावलेल्या यादीत माझे वडील नामे
किसन झोडागे यांचे नावाने घरकुल मंजूर झाल्याचे मला दिसले.दिनांक 11/07/2022 रोजी मी माझे गाव सालेषहरी येथे माझे वडीलांचे
नावानी मंजूर झालेल्या घरकुलाचे बांधकामा करीता लागणारे कागदपत्रे देण्याकरीता ग्रा.पं. सालेषहरी येथे गेलो. तेव्हा ग्रा. पं. सालेषहरी येथील
सरपंच नामे संजु उर्फ संजय नाईक वय अंदाजे 28 वर्ष हे ग्रा. पं. कार्यालयात हजर असल्याने त्यांना मी भेटलो व माझे कागदपत्रे दाखविले.
तेव्हा सरपंच नामे संजु उर्फ संजय नाईक यांनी मला म्हटले की, तुझे वडीलांचा प्लट पुनर्वसन मध्ये असल्यामुळे मी तुझे वडीलांचे घरकुल रद्द
करतो.त्यामुळे तुझे वडीलांचे नाव घरकुल यादीत ठेवायचे असेल तर मला 7000 रू दे, पैसे दिले नाही तर मी तुझे वडीलाचे नाव यादीतुन
वगळतो, असे म्हणुन मला 7,000 रू लाचेची मागणी केली. तेव्हा मी सरपंच संजु उर्फ संजय नाईक यांना पैसे देण्यास होकार दिला. त्यानंतर
दि.20/7/2022 रोजी सुध्दा मला सरपंच संजु उर्फ संजय नाईक यांचा फोन आला व पैसे घेवुन येण्यास सांगीतले. तेव्हा 22/7/2022 रोजी
तुम्हाला पैसे आणुन देतो असे म्हणुन वेळ मागीतला.मला सरपंच संजु उर्फ संजय नाईक ग्रा. पं. कार्यालय सालेषहरी, ता.भिवापुर, जि.नागपूर
यांनी माझे वडीलांचे नावानी मंजूर झालेले घरकुल रद्द न करणे करीता लाच रक्कम रू. 7,000/-रू लाचेची मागणी केली आहे. तरी माझी लाच
रक्कत 7,000 रू सरपंच संजु उर्फ संजय नाईक यांना देण्याची मुळीच ईच्छा नाही तसेच त्यांच्याशी माझे कुठलेही वैमनस्य नाही व कुठल्याही
प्रकारचे आर्थीक देवाण घेवाणीचे संबंध नाही. तरीत्यांचे विरूध्द कायदेषिर कार्यवाही करिता रिपोर्ट देत आहे. सरपंच संजु उर्फ संजय नाईक ग्रा.
पं. सालेषहरी यांना लाच रक्कम 7,000/- रुपयाची माझेजवळ जुळवाजुळवझाली नसल्याने, माझे वैयक्तिक बचतीतून जमा केलेले रु. 5,000



Scanned with CamScanner

/- लाचरक्कम देणेकरीता आपणाकडे हजर करीत आहे. तसेच वडीलांचे प्लट संबंधी ताबा पावती व कर पावती मी जमा करत आहे. करीता
सरपंच संजु उर्फ संजय नाईक ग्रा. पं. सालेषहरी यांच्याविरुध्द योग्य कार्यवाही होण्याकरीता मी मराठी भाषेत स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार देत
आहे. स्वाक्षरी/-( गोपाल किसन झोडगे )त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे, ला.प्र.वि.,नागपूर यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण
करून मला त्यांची ओळख करून दिली. त्यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस
निरीक्षक प्रविण लाकडे, ला.प्र.वि.नागपूर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व मी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक
प्रविण लाकडे, ला.प्र.वि., नागपूर यांनी स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे, ला.प्र.वि. नागपूर यांनी माझ्याकडून लाचेकरिता
वापरण्यात येणारी रक्कम रू. 5,000/- घेतले व त्यांनी त्यांच्या कार्यालयातील भारतीय बच्चो का बैक मधील 500/-रू दराच्या 4 बनावट
नोटा असे 2000/- उपलब्ध करून घेवुन, गै.अ. श्री. संजय नाईक यांना देण्याकरीता लाच रक्कम 7000/-रू. तयार करून घेतली. त्यावेळी
माझे व पंचासमक्ष सदरच्या नोटांना अंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन करावयाच्या कारवाईचे प्रात्यक्षिक करून दाखविले.
तसेच व्हाईस रेकर्डर कषा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यावेळी माझेकडून लाच रक्कम म्हणून घेण्यात आलेल्या नोटांना
अथ्रसिन पावडर लावली. त्याबाबत पंचनाम्यात नमुद केले आहे. मला गैरअर्जदार श्री. संजु उर्फ संजय नाईक यांनी दि. 22/07/2022 रोजी
लाच रक्कम घेवुन बोलाविले असल्याने सापळा पडताळणी कार्यवाही दिनांक 22/07/2022 रोजी साईधाम सेलिब्रेषन जवळ, भिवापूर-निलज
रोड, भिवापूर येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे व पोलीस उप-अधीक्षक, अनामिका मिर्झापूरे,
दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य शासकीय चारचाकी वाहन क्र. एम.एच. 31-डी.झेड-0385 व मी माझे खाजगी वाहन फे◌ार्ड एस्पायर
वाहन क्र. एम.एच. 49-ए.टी.-1202 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय झिरो माईल नागपूर येथुन रवाना झालो. त्यानंतर साईधाम
सेलिब्रेषनजवळ, भिवापूर-निलज रोड, भिवापूर येथे पोहोचलो. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे यांनी पंचासमक्ष लोकसेवक यांची लाच
रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकर्डरव्दारे रेकर्ड करण्यात येणार
असल्याचे सांगून सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकर्डर सुरू करून पंच क्र. 1 यांचेसोबत मला
आरोपी सरपंच श्री. संजु उर्फ संजय नाईक यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे वाहन क्र. एम.एच. 49, ए.टी.1202 ने
पाठविण्यात आले. मी पंच क्र.1 सह निखिल झेरक्स अड कंम्पुटर, बस स्टड भिवापूर, येथे गेलो असता तेथे आरोपी सरपंच संजु उर्फ संजय
नाईक हे हजर मिळून आले. आरोपी लोकसेवक संजु उर्फ संजय नाईक यांनी मला असे म्हटले की, तुझे वडीलांचे नाव घरकुल यादीत ठेवायचे
असेल तर मला 7000 रू दे, पैसे दिले नाही तर मी तुझे वडीलाचे नाव यादीतुन वगळतो, याच कारणाकरीता श्री नाईक यांनी मला लाच रक्कम
रू. 7,000/- ची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्षविली. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या
ठिकाणी परत येवून पंच क्र. 1 यं◌ाच्या आवाजात व्हाईस रेकर्डर बंद केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे यांनी व्हाईस रेकडर मध्ये
रेकर्ड झालेले संभाषण ए◌ैकून आरोपी संजु नाईक, सरपंच ग्रा. पं. सालेषहरी, ता. भिवापुर जि. नागपूर यांनी माझे वडीलांचे नावानी मंजूर
झालेले घरकुल रद्द न करणे करीता लाच रक्कम रू. 7,000/-रू ची मागणी करून स्वतः स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केली.
त्यानंतर लगेच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे यांनी सापळा कारवाईच्या वेळी
घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच स्विकारल्यानंतर माझा उजवा हात
डोक्यावरून फिरविण्याचा इषारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इषारा मिळताच लाच स्विकारणायास रंगेहात
पकडतील असे सांगीतले. त्यानंतर त्याच दिवषी दि. 22/07/2022 रोजी अंथ्रासीन पावडर लावलेले रू. 7000/- रक्कम.(ज्यात 500/- रू
दराच्या 10 चलनी खया नोटा 5,000 रू व बनावटी 500 दराच्या 4 नोटा 2000 रू.) मला देण्यात आले. त्यानंतर वर ठरविल्याप्रमाणे श्री.
नाईक यांना माझ्या मोबाईल क्र. 9342994229 वरुन श्री नाईक यांचे मोबाईल क्र. 9579690672 वर मी फोन केला. त्यावेळी श्री संजु
उर्फ संजय नाईक हे मला बोलले की, तुम्ही पंचायत समिती कार्यालय, भिवापूर येथे या, अषा बोलण्यावरुन पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे यांनी
सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवून, पंच क्र. 1 यांच्या आवाजात, व्हाईस रेकर्डर सुरू करून, व्हाईस रेकर्डर धाग्याच्या
सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. 1 यांचेसह माझे वाहन क्र. एम.एच. 49, ए.टी.1202 ने दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक श्री. संजु उर्फ
संजय नाईक यांना लाच रकम देण्याकरीता, पंचायत समिती कार्यालय, भिवापूर येथे पाठविण्यात आले. आमचे मागोमाग पंच क्र. 2 व सापळा
पथक रवाना होवून, आरोपी लोकसेवक हे पंचायत समिती कार्यालय, भिवापूर येथे मला भेटले तेथुन आम्ही पंचायत समिती कार्यालय, भिवापूर
जवळच्या चहाटपरीवर चहा पिण्यासाठी गेलो.सापळा पथकातील सदस्य व पंच क्र. 2 हे गटा-गटाने पंचायत समिती कार्यालय भिवापूर परिसरात
उभे होते. आरोपी लोकसेवक श्री संजु उर्फ संजय नाईक यांचेषी कामाविषयी बोलणी करून त्यांनी माझेकडून लाच रक्कम रू. 7,000/-
स्विकारली. सापळा पथकास मी माझा उजवा हात डोक्यावर फिरवुन श्री संजु उर्फ संजय नाईक यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत
इषारा केला. त्यावेळी सापळा पथकाने आरोपी श्री संजय नाईक यास रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. 1 च्या आवाजात व्हाईस
रेकर्डर बंद केला. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक प्रविण लाकडे यांनी पंचनाम्यात घेतल्या आहेत.
तरी आरोपी सरपंच श्री. संजय उर्फ संजु दिलीप नाईक, वय 28 वर्ष पद-सरपंच गटग्रामपंचायत सालेषहरी रा. रा. मु. सालेभट्टी पो. खुटांबूरी,
ता. भिवापूर जि. नागपूर यांनी तुझे वडीलांचे नाव घरकुल यादीत ठेवायचे असेल तर मला 7000 रू दे, पैसे दिले नाही तर मी तुझे वडीलाचे
नाव यादीतुन वगळतो, अषी मला लाच रक्कमेची मागणी करून माझेकडुन लाच रक्कम रू. 7,000/- घेण्याची तयारी दर्षवून स्वतः स्विकारली
म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेषिर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली, ती माझ्या
सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष ............................ (प्रविण मुरलीधर लाकडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर.

पोलीस स्टेशन भिवापूर नागपूर (ग्रा.)

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव): सदर
**District** (जिल्हा): नागपुर शहर
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Gopal Zade

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

N.P.9/2158

ठाणे अंमलदार भिवापूर नागपूर (ग्रा.)

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

**Name** (नाव): MAHESH MADHUKAR BHORTE
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): POBW04422



Scanned with CamScanner

पोलीस स्टेशन ... (ग्रामिण)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner